**नियमित फौजदारी खटला क्र.१८२/२०२१**
**निशाणी क्र.२३**

## दोषारोप

मी, डी.एम.हिंग्लजकर, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, अकोले, तुम्हावर दोषारोप ठेवत आहे की,

१. **बाळचंद्र मुरलीधर चव्हाणके,**
वय वर्ष– ५०,

२. **संकेत बाळचंद्र चव्हाणके,**
वय वर्ष– २३,
दोघे रा.गर्दणी, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**खालीलप्रमाणेः–**

**१.** दिनांक १२.०२.२०२१ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजताचे सुमारास गर्दणी, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे तुम्ही आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन साक्षीदार चंद्रभान पंढरीनाथ चव्हाणके यांना लाकडी फावड्याचा दांडा, की ज्याने मृत्यू होण्याचा संभव आहे, अशा हत्याराने व फिर्यादी यांना धक्काबुक्की व मारहाण करून त्यांचे किरकोळ दुखापतीस कारणीभूत झालात, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

२. वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन साक्षीदार यांना लाकडी फावड्याच्या दांड्याने आणि फिर्यादी यांना धक्काबुक्की व मारहाण करून त्यांचे किरकोळ दुखापतीस कारणीभूत झालात, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

**३.** वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ केली व त्यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल, किंवा अपराध घडेल अशा प्रकारे त्यांना प्रक्षोभित केले, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

**४.** वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली व त्यांना फौजदारी पात्र धाकदपटशा केली, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

आणि यावरुन मी तुम्हाला सुचना करतो की, तुमची माझेसमोर या दोषारोपांची चौकशी होणार आहे.

–

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR Date: 2025.11.27 17:05:17 +0530

**दिनांक : २६.११.२०२५** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**

टिपण :– हा दोषारोप आरोपींस वाचून व समजावून सांगितला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR Date: 2025.11.27 17:05:23 +0530

**दिनांक : २६.११.२०२५** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**